असा. क्र. ४४। रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, मे २, २००८/वैशाख १२, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.**—मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . २२९-२३१

दिनांक २९ एप्रिल २००८ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २ मे २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**



[ **किंमत :** रुपये १५.०० ]

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ब ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ब मधील दोन्ही परंतुके वगळण्यात येतील. १८८८ चा मुंबई ३.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ब ची सुधारणा.

**३.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम ५ब मधील दोन्ही परंतुके वगळण्यात येतील. १९४९ चा मुंबई ५९.

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ९अअ ची सुधारणा.

**४.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याच्या कलम ९अअ मधील दोन्ही परंतुके वगळण्यात येतील. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

१९६५ चा महा. ४०. **५.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ९अ मधील दोन्ही परंतुके वगळण्यात येतील. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९अ ची सुधारणा.

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०. **६.** शंका दूर करण्याकरिता, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी, महानगरपालिका किंवा नगरपरिषदा यांच्या राखीव जागेसाठीची निवडणूक, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ किंवा यथास्थिति, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या अशा प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या, संबंधित तरतुदींद्वारे विनियमित करण्यात येईल. शंका दूर करणे.

असा. क्र. ३५ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, मे २, २००८/वैशाख १२, शके १९३०

'स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Amendment) Act, 2008 (Mah. Act No. XIII of 2008), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. XIII OF 2008.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 2nd May 2008)*

An Act further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporation Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948 and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965.

Bom. III of 1888. Bom. LIX of 1949. C.P. and Berar II of 1950. Mah. XL of 1965.

WHEREAS it is expedient further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948 and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Fifty-ninth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Amendment) Act, 2008.

(2) It shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint.

Amendment of section 5B of Bom. III of 1888.

**2.** In section 5B of the Mumbai Municipal Corporation Act, both the provisos shall be deleted. Bom. III of 1888.

Amendment of section 5B of Bom. LIX of 1949.

**3.** In section 5B of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, both the provisos shall be deleted. Bom. LIX of 1949.

Amendment of section 9AA of C.P. and Berar II of 1950.

**4.** In section 9AA of the the City of Nagpur Corporation Act, 1948, both the provisos shall be deleted. C.P. and Berar II of 1950.

Amendment of section 9A of Mah. XL of 1965.

**5.** In section 9A of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, both the provisos shall be deleted. Mah. XL of 1965.

Removal of doubt.

**6.** For the removal of doubt, it is hereby declared that, the election to a reserved seat to the Municipal Corporations or Municipal Councils, before the date of coming into force of this Act, shall be regulated by the relevant provisions of the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Coporations Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948, or, as the case may be, the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, as they existed immediately before such date of commencement. Bom. III of 1888. Bom. LIX of 1949. C.P. and Berar II of 1950. Mah. XL of 1965.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई